Diploma Programme
Programme du diplôme
Programa del Diploma

# Marathi A: literature – Standard level – Paper 2
# Marathe A : littérature – Niveau moyen – Épreuve 2
# Marathi A: literatura – Nivel medio – Prueba 2

Thursday 11 May 2017 (morning)
Jeudi 11 mai 2017 (matin)
Jueves 11 de mayo de 2017 (mañana)

1 hour 30 minutes / 1 heure 30 minutes / 1 hora 30 minutos

## Instructions to candidates

- Do not open this examination paper until instructed to do so.
- Answer one essay question only. You must base your answer on at least two of the part 3 works you have studied and compare and contrast these works in response to the question. Answers which are not based on a discussion of at least two part 3 works will not score high marks.
- You are not permitted to bring copies of the works you have studied into the examination room.
- The maximum mark for this examination paper is **[25 marks]**.

## Instructions destinées aux candidats

- N’ouvrez pas cette épreuve avant d’y être autorisé(e).
- Traitez un seul sujet de composition. En basant votre réponse sur au moins deux des œuvres de la troisième partie que vous avez étudiées, vous devez comparer et opposer ces œuvres dans le cadre du sujet. Les réponses qui ne sont pas basées sur au moins deux des œuvres de la troisième partie n’obtiendront pas une note élevée.
- Vous n’êtes pas autorisé(e) à apporter des exemplaires des œuvres que vous avez étudiées dans la salle d’examen.
- Le nombre maximum de points pour cette épreuve d’examen est de **[25 points]**.

## Instrucciones para los alumnos

- No abra esta prueba hasta que se lo autoricen.
- Conteste una sola pregunta de redacción. Base su respuesta en al menos dos de las obras estudiadas de la parte 3, comparándolas y contrastándolas en relación con la pregunta. Las respuestas que no se basen en al menos dos obras de la parte 3 no recibirán una puntuación alta.
- No está permitido traer copias de las obras estudiadas a la sala de examen.
- La puntuación máxima para esta prueba de examen es **[25 puntos]**.

2217 – 0600



© International Baccalaureate Organization 2017

International Baccalaureate®
Baccalauréat International
Bachillerato Internacional

कोणत्याही **एकाच** प्रश्नावर निबंध लिहा. तुमचे उत्तर तुम्ही अभ्यासलेल्या भाग ३ मधील **किमान दोन** साहित्यकृतींवर आधारलेले असावे. तुम्ही तुमचे उत्तर लिहिताना त्या साहित्यकृतींची परस्परांशी **तुलना करीत**, **साम्यभेद दाखवून देत** विवेचन करणे अपेक्षित आहे. ज्या उत्तरांमध्ये भाग ३ मधील किमान दोन तरी साहित्यकृतींची चर्चा समाविष्ट **नसेल**, त्या उत्तरांना अधिक गुण मिळणार **नाहीत**.

**नाटक**

**1.** नाटकाच्या रचनेत ‘अंक’ आणि ‘प्रवेश’ यांचे स्थान याविषयी तुम्ही अभ्यासलेल्या किमान दोन साहित्यकृतींच्या आधारे चर्चा करा.

**2.** तुम्ही अभ्यासलेल्या किमान दोन नाटककारांनी पात्रांची विश्वसनीयता निर्माण करण्याकरिता वापरलेल्या तंत्रांची तुलना करा.

**3.** "नायक आणि खलनायक हे कायम नाटकाच्या केंद्रस्थानी असतात." तुम्ही अभ्यासलेल्या किमान दोन साहित्यकृतींतील नायक आणि खलनायक यांच्या विकासाचा व स्थानाचा शोध घ्या.

**काव्य**

**4.** तुम्ही अभ्यासलेल्या किमान दोन कवींनी कवितेच्या शीर्षकांचा विशिष्ट परिणाम साधण्यासाठी कसा वापर केला आहे याचा तौलनिक परामर्श घ्या.

**5.** तुम्ही अभ्यासलेल्या किमान दोन कवींनी वैश्विक महत्त्व असलेल्या प्रतीकांचा व्यक्तिविशिष्ट वापर कसा केला आहे हे त्यांतील साम्यभेदांसह सांगा.

**6.** कवितेतील निसर्ग ही कवीच्या भावभावनांची अभिव्यक्ती असू शकते. तुम्ही अभ्यासलेल्या किमान दोन कवींनी स्वतःला व्यक्त करण्यासाठी निसर्गदृश्यांचा वापर कसा केला आहे ते सांगा.

**कल्पित गद्य**

**7.** कालानुक्रम न पाळता कथा सांगण्याच्या तुलनेत कालानुक्रमे कथा सांगण्याच्या परिणामकारकतेची तुम्ही अभ्यासलेल्या किमान दोन साहित्यकृतींच्या संदर्भात चर्चा करा.

**8.** तुम्ही अभ्यासलेल्या किमान दोन साहित्यकृतींच्या संदर्भात निवेदकाचे महत्त्व आणि एकूण साहित्यकृतीतील त्याचे स्थान यांची चर्चा करा.

**9.** तुम्ही अभ्यासलेल्या किमान दोन साहित्यकृतींतील विनोदाचे किंवा हास्यकारक घटकांचे विश्लेषण करा.

**वास्तवाधारित गद्य**

**10.** "वास्तवाधारित लेखनामागे बहुधा ठोस उद्देश असतो". हा उद्देश तुम्ही अभ्यासलेल्या किमान दोन साहित्यकृतींमधून कसा आणि किती प्रमाणात स्पष्ट झाला आहे ते सांगा.

**11.** तुम्ही अभ्यासलेल्या किमान दोन लेखकांनी जास्तीत जास्त परिणाम साधण्यासाठी आपल्या साहित्यकृतींची रचना कशी केली आहे याची चर्चा करा.

**12.** वास्तवाधारित साहित्यकृतीसाठी तर्कनिष्ठ व समाधानकारक शेवट आवश्यक असतो ह्या दाव्याची वैधता आणि शेवटाचा संहितेवर होणारा परिणाम यांची तुम्ही अभ्यासलेल्या किमान दोन साहित्यकृतींच्या संदर्भात चर्चा करा.